गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी–गोवा

वार्तापत्र

# निरोगी आणि चांगल्या वातावरणात मुलांचे पोषण करा–जस्टीस गुप्ते

ता. 12 जून 2019

22 ज्येष्ठ 1941

मुंबई उच्च न्यायालयाचे गोवा खंडपिठाचे न्यायमूर्ती श्री. एस सी गुप्ते यांनी मुले ही आपली भावी पिढी आहे आणि त्यामुळे त्यांच्या हक्काचे संरक्षण केले पाहिजे. समाजाची ती मुख्य घटक आहेत त्यामुळे निरोगी आणि चांगल्या वातावरणात मुलांचे पोषण करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

पाटो पणजी येथील कदंब बसस्थानक येथून बाल मजूर विरोधी रॅलीचे बावटा दाखवून सुरवात केल्यानंतर श्री. गुप्ते बोलत होते. गोवा राज्य कायदा सेवा प्राधिकरणाने महिला आणि बाल विकास संचालनालय तसेच मजूर आणि रोजगार खाते आणि गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सहकार्याने या रॅलीचे आयोजन केले होते. बाल मजूरी दूर करण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ही रॅली आयोजित केली होती.

श्री. गुप्ते यांनी मुलांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या लोकांची प्रशंसा केली. तसेच लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी रेलीचे आयोजन केल्याबद्दलही त्यांनी प्रशंसा व्यक्त केली.

जस्टीस सी व्ही भडंग, जस्टीस पृथ्वीराज के. चव्हाण, प्रधान जिल्हा न्यायाधिश श्री. ईर्शाद आगा, निबंधक श्री. सुधीर देशपांडे, गोवा राज्य कायदा सेवा प्राधिकरणाच्या सदस्य सचिव श्रीमती सायोनारा टेलिस लाड, कल्याण समितीच्या अध्यक्षा श्रीमती लिडा जुआंव (दक्षिण) कल्याण समितीचे अध्यक्ष श्री. गुरूनाथ धुरी यावेळी उपस्थित होते.

गोवा महिला आणि बाल विकास संचालक श्री. प्रदिप देसाई यांनी पाहुण्याचे स्वागत केले.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/327